राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायतींमध्ये घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र.स्वमअ-२०१७/प्र.क्र.१२६/नवि-१४,
मंत्रालय, मुख्य इमारत (४ था मजला),
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ११ जुले, २०१९.

संदर्भ: -१.शासन अधिसूचना क्र. एसडब्ल्यूएम -२०१८/प्र.क्र.१२६(१) व (२)/नवि-३४, दि.१९.१२.२०१८.
२.शासन अधिसूचना क्र.एसडब्ल्यूएम-२०१८/प्र.क्र.१२६(१) व (२)/नवि-३४, दि.९ जुलै, २०१९.

## प्रस्तावना

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ विहीत केले आहेत. तद्नुसार, सदर नियम अधिसूचीत झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीच्या आत नागरी स्थानिक संस्थानी याबाबतचे उपविधि तयार करुन, त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक होते. तथापि, त्याबाबत विहीत कार्यवाही न झाल्याने, संदर्भिय क्र.१ येथील अधिसूचनांनुसार शासनाने घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य प्रारुप उपविधी प्रसिध्द करुन, त्याबाबत नागरी स्थानिक संस्थांकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. याबाबत सर्वंकष विचार करुन, शासनाने संदर्भ क्र.२ येथील अधिसूचनांनुसार सदर प्रारुप उपविधी अंतिम करुन, घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी अधिसूचीत केले आहेत. सदर उपविधी महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायतींमध्ये लागू करण्याबाबत या संस्थांना सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५०(अ) तसेच, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३१२(अ) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन, शासनाने घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी विहीत केले आहेत.

२. संदर्भ क्र.२ च्या अधिसूचनेच्या दिनांकापासून सदर उपविधीची अंमलबजावणी राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायतींमध्ये करण्यात येईल. अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन, सदर उपविधी विहीत केले असल्याने, उपविधी लागू करण्यासाठी महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या ठरावाची वा स्वतंत्र मान्यतेची आवश्यकता असणार नाही.

३. सदर उपविधीची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/ नगरपंचायती यांची असेल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०१९०७१११११३२४५५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay S Gokhale

(सं.श.गोखले)
शासनाचे सह सचिव

प्रत:-

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (नवि) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (सर्व)
६. जिल्हाधिकारी (सर्व)
७. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
८. सर्व सह / उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. राज्य अभियान संचालनालय, स्वच्छ भारत अभियान, मुंबई
१०. मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत (सर्व)
११. निवडनस्ती (नवि-१४)